# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

प्रेसनोट

## 'पीएमपीएमएल' कडून कोथरूड डेपो ते आळंदी नवीन बसमार्ग सुरू

पीएमपीएमएल कडून प्रवाशी व भाविकांच्या मागणीनुसार मार्ग क्रमांक २१९ कोथरूड डेपो ते आळंदी या नवीन बसमार्गाचा शुभारंभ दि. ०५/१०/२०२४ रोजी केंद्रीय राज्यमंत्री मा. श्री. मुरलीधरजी मोहोळ यांच्या सुविद्य पत्नी माजी नगरसेविका मा. सौ. मोनिकाताई मुरलीधरजी मोहोळ, सामाजिक कार्यकर्ते मा. श्री. प्रभाकर किसन मोहोळ व किर्तनकार ह.भ.प. मा. श्री. धर्मराज हांडे महाराज यांच्या हस्ते करण्यात आला.

याप्रसंगी पुणे महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका मा. अल्पनाताई वरपे व मा. वासंतीताई जाधव, माजी नगरसेवक मा. श्री. नवनाथजी जाधव व मा. श्री. नितीनजी शिंदे, सामाजिक कार्यकर्ते मा. श्री. गणेशजी वरपे, मा. श्री. बाळासाहेब विचारे, मा. श्री. शिवाजी शिंदे, मा. श्री. रामदास झुंजुर्के, पीएमपीएमएल चे कामगार व जनता संपर्क अधिकारी मा. श्री. सतिश गाटे, कोथरूड डेपोचे आगार व्यवस्थापक श्री. राजेंद्र गाजरे, आगार अभियंता श्री. विलास मते यांची प्रमुख उपस्थिती होती.

**पीएमपीएमएल कडून सुरु करण्यात कोथरूड डेपो ते आळंदी या बससेवेचा तपशील खालीलप्रमाणे**

| मार्ग क्रमांक | पासून-पर्यंत | मार्गे | पहिली बस | शेवटची बस |
|---|---|---|---|---|
| २१९ | कोथरूड डेपो ते आळंदी | वनाज, मोरे विद्यालय, डेक्कन कॉर्नर, फर्ग्युसन कॉलेज, म.न.पा. भवन, वाकडेवाडी, मुळा रोड, विश्रांतवाडी, दिघी, थोरल्या पादुका मंदिर, देहू फाटा, आळंदी | सकाळी ०६.०५ वा. | सायं. ०६.१५ वा. |
| | आळंदी ते कोथरूड डेपो | | सकाळी ०७.४० वा. | रात्रौ ०८.०५ वा. |

तरी सदरच्या बससेवेचा लाभ भाविक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरीक, महिला, नोकरदार यांनी घ्यावा, असे आवाहन पीएमपीएमएल कडून करण्यात येत आहे.

---

दि. ०५/१०/२०२४.

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

**Sd/-**
कामगार व जनता संपर्क अधिकारी
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---